**प्रेसनोट दिनांक - २४/०५/२०१९**

**डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**आत्महत्या करणा-या मनोरुग्ण नागरीकांचे पोलीसांनी वाचवले प्राण**

---

दिनांक २४/०५/२०१९ रोजी प्रभात बिट मार्शल वरती श्री. चव्हाण पोना ११६९ व श्री मलगुंडे पोशि ७४४० यांना रात्रपाळी ड्युटी असतांना पहाटे ०३/१५ वा. दरम्यान नियत्रंण कक्ष, पुणे शहर येथुन एस. एम. जोशी ब्रिजवरुन एक नागरीक आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत आहे असा कॉल प्राप्त झाला. तात्काळ सदर ठिकाणी प्रभात बिट मार्शल, डेक्कन पीटर मोबाईल वरील नाईट राऊंड अधिकारी श्री पाठक, सहा पोलीस फौजदार व श्री भांगे पोशि ८४२४ श्री चव्हाण, पोशि ९९४९ श्री. ढाकणे, पोशि १०५५० यांनी कॉल पॉईटला जावुन एस. एम. जोशी पुलाचे कठाड्याचे लोखंडी पाईपला एक इसम लटकलेला दिसला त्यास तात्काळ वरती घेवुन नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव लालु निकम रा. सुतारदरा, कोथरुड, पुणे असे सांगितले. त्यांना पीटर मोबाईल मधुन सुतारदरा येथे घेवुन गेले त्यावेळी समिर लालु निकम रा. शिवकल्याण नगर, सुतारदरा कोथरुड पुणे यांनी डेक्कन पोलीस स्टेशन येथे येवुन आपले वडील लालु हरीभाऊ निकम वय ५४ वर्षे मनोरुग्ण असुन रात्रौ झोपेत उठुन घराच्या बाहेर निघुन गेले आहेत असे सांगितले तेव्हा ठाणे अंमलदार यांनी पोना ११६९ चव्हाण यांच्याशी संपर्क साधुन खात्री करुन सदर इसमास तुमचे वडील सुखरुप मिळाले असुन पोलीस तुमच्या घराचा पत्ता सुतारदरामध्ये शोधत आहेत तुम्ही घरी जा असे कळविले. पोना ११६९ चव्हाण व भांगे यांनी लालु हरीभाऊ निकम यांना त्यांचा मुलगा समिर यांचे ताब्यात दिले. समिर निकम यांनी पोलीसांच्यामुळेच आपले वडील सुखरुप परत मिळाले असे म्हणुन पोलीसांचे आभार मानले.

